**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २५ जून २०२५**

**ठळक बातम्या**

**1. भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लांचं फाल्कन नाईन रॉकेटमधून यशस्वी उड्डाण/ अंतराळातून देशवासियांसाठी पाठवला संदेश.**

**2. संविधान हत्या दिनानिमित्त मानवाधिकारांच्या मूल्यांचं संवर्धन करण्याच्याहेतूनं आज देशभरात विविध कार्यक्रम.**

**3. हायकोर्ट बार असोसिएशन तर्फे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा 28 जून रोजी नागपुरात सत्कार.**

**4. भालाफेकपटू नीरज चोप्राने पटकावलं ओस्ट्रावा गोल्डनस्पाईक स्पर्धेत सुवर्णपदक.**

**-----------------------------------**

**एक्सिओम चार**

**नासाच्या ॲक्सिओम फोर या अंतराळ मोहिमेत सहभागी झालेले भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांनी अंतराळातून संदेश पाठवला आहे. हा प्रवास अद्भुतरम्य असून साडे सात किलोमीटर प्रति सेकंद इतक्या वेगाने आपण पृथ्वीभोवती फिरत आहोत, असं शुक्ला या संदेशात म्हणाले आहेत...**

**(होल्ड बाईट - शुभांशु शुक्ला -40 सेकंद )**

***नमस्कार, मेरे प्यारे देशवासियों, वाटर राइड 41 साल बाद हम वापस अंतरिक्ष में पहुँच गए हैं और कमाल की राइट थी। इस समय हम 7.5 किलोमीटर प्रति सेकंड की रफ्तार से पृथ्वी के चारों तरफ घूम रहे हैं और मेरे कंधे पे मेरे साथ मेरा तिरंगा है जो मुझे बता रहा है कि मैं आप तक के साथ हूँ। ये मेरी इंटरनेशनल स्पेस स्टेशन तक की जर्नी की शुरुआत नहीं है। ये भारत के ह्यूमन स्पेस प्रोग्राम की शुरुआत है और मैं चाहता हूँ कि आप सभी देशवासी इस यात्रा का हिस्सा बनें। आपका भी सीना गर्व से चौड़ा होना चाहिए। आप भी उतना ही एक्साइटमेंट दिखाइए। आइए हम सब मिलकर भारत की ह्यूमन स्पेस प्रोग्राम की जर्नी शुरुआत करें। जय हिंद, जय भारत।***

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन फाल्कन नाईन हे रॉकेट आज अंतराळात झेपावलं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या ॲक्सिऑम फोर या अवकाश मोहिमेला आज फ्लोरिडा इथे केनेडी स्पेस सेंटरवरून आज दुपारी बारा वाजून १ मिनिटाने प्रारंभ झाला. या रॉकेटमधल्या स्पेसएक्स ड्रॅगन या अंतराळयानातून चार अंतराळवीरांचं पथक आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने प्रवास करत आहे. या मोहिमेचं नेतृत्व अमेरिकेचे कमांडर पेगी व्हिटसन करत आहेत. हंगेरीचे टिबोर कापू आणि पोलंडचे स्लावोस उझनान्स्की हे या मोहिमेतले तज्ञ आहेत. तर शुभांशू शुक्ला पायलट म्हणून काम पाहत आहेत. यंदाच्या २९ मे रोजी हे उड्डाण नियोजित होतं. मात्र ही मोहीम तांत्रिक अडचणींमुळे आतापर्यंत अनेक वेळा पुढे ढकलण्यात आली होती. ॲक्सिओम फोरच्या यशस्वी उड्डाणाबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल अभिनंदन केलं आहे. भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय बनणार आहेत. ते या प्रवासात एकटे नसून त्यांच्यासोबत १४० कोटी भारतीयांच्या इच्छा, आशा आणि आकांक्षा आहेत. शुक्ला आणि त्यांच्या सहकारी अंतराळवीरांना या मोहिमेच्या यशासाठी शुभेच्छा असं प्रधानमंत्री आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, कॅप्टन शुभांशु शुक्ला या मोहिमेदरम्यान सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाशी संबंधित सात प्रयोग करतील. यात किरणोत्सर्गाचा शैवालांवर होणारा परिणाम, अवकाशात बियाणं पेरणं अशा विविध प्रकारच्या प्रयोगांचा समावेश आहे.

----------------------------------

संविधान हत्या दिवस

संविधान हत्या दिवस आज पाळण्यात येत आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. १९७५ मध्ये या दिवशी तत्कालीन राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी अंतर्गत अशांततेच्या धोक्यांचा हवाला देत कलम ३५२ अंतर्गत आणीबाणीची घोषणा केली. वाढत्या राजकीय अशांतता आणि न्यायविषयक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आणीबाणीची घोषणा करण्यात आली. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातल्या सरकारने राज्यांचे अधिकार केंद्राच्या नियंत्रणाखाली आणले. या घोषणेनंतर संवैधानिक अधिकारांवर निर्बंध आले. राज्यघटनेच्या कलम १९ अन्वये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर गदा आली होती. त्यामुळे

वृत्तपत्रं तसंच इतर माध्यमांवर निर्बंध लादले गेले. या १८ महिन्यांच्या काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या सर्वांना आजच्या संविधान हत्या दिनी आदरांजली वाहण्यात येत आहे. या निमित्तानं प्रत्येक भारतीयाच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीची ज्योत तेवत राहते, तसंच हुकुमशाही प्रवृत्तींशी लढा देण्याची प्रेरणा मिळत राहावी याकरता हा दिवस गेल्या वर्षीपासून पाळला जातो.आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमातून आपले विचार मांडताना प्रधानमंत्री मोदी यांनी आणीबाणी हा देशाच्या इतिहासातला सर्वात काळा अध्याय होता. या काळात लोकशाहीचं समर्थन करणाऱ्यांवर अत्याचार केले जात होते, असं मोदी आपल्या संबोधनात म्हणाले.

*(होल्ड बाईट -प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १६ सेकंड )*

*यह भारत के इतिहास का काला दौर था। लाखों लोगों ने इमरजेंसी का पूरी ताकत से विरोध किया था। लोकतंत्र के समर्थकों पर उस दौरान इतना अत्याचार किया गया। इतनी यातनाएं दी गई कि आज भी मन से हर उठता है*

---

संविधान हत्या दिन

संविधान हत्या दिनानिमित्त मानवाधिकारांच्या मूल्यांचं संवर्धन करण्याच्या हेतूनं आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. २५ जून १९७५ हा दिवस भारतीय लोकशाहीसाठी सगळ्यात काळा दिवस असून त्याची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणूनच तो दिवस कायम लक्षात राहण्याची गरज आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. संविधान हत्या दिवसानिमित्त मुंबईत राजभवन इथं आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ आणि सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या काळात देशाची लोकशाही वाचवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या नागरिकांमुळेच आज भारत जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणून उभा आहे, असं त्यांनी सांगितलं.आणीबाणी लागू करणं ही लोकशाहीची हत्या होती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना संपवणारा तो काळा दिवस होता, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या काळात लोकशाहीच्या सेनानींच्या लढ्यामुळे भारताची राज्यघटना आणि लोकशाही वाचली. आता भारताची लोकशाही इतकी प्रगल्भ आहे, की कुणीही कितीही प्रयत्न केला, तरी ती संपवू शकणार नाही, असंही फडणवीस यांनी नमूद केलं.

*(होल्ड बाइट -फडणवीस ३२ सेकंड )*

*एक घटना प्रत्येक देशाच्या लोकशाहीच्या इतिहासात अशी आली आहे की ज्या घटनेमध्ये जे देश लोकशाही वाचवू शकले तिथे लोकशाही चिरकार टिकली आणि*

*त्याच क्षणी ज्या देशांमध्ये लोकशाही वाचली नाही ते देश आजही तानाशाहीखाली आपल्याला पाहायला मिळतात तीच वेळ १९७५ साली भारतावर आली होती.जर आमच्या लोक तंत्रसेनानींनी हि लोकशाही वाचवली नसती तर पाकिस्तान आणि भारतामध्ये कुठलाच अंतर राहिलं नसतं हा देश लोकशाही पुरस्कृत करणारा देश आहे.*

----------------------------------

आणीबाणी

आज संविधान हत्या दिनी आणीबाणी धारकांना शासनातर्फे नागपुरातील सदर येथील नियोजन भवन येथे सन्मानित करण्यात आले. नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, अप्पर आयुक्त तेजु सिंग पवार, नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या हस्ते, या समारोहात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र बहाल करण्यात आले.

----------------------------------

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई

हायकोर्ट बार असोसिएशन तर्फे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार येत्या शनिवारी 28 जून रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता रेशीम बाग मधील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष एडवोकेट अतुल पांडे यांनी दिली. गवई यांनी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि सरकारी वकील म्हणून नागपूर शहरात स्वतःची कारकीर्द घडवली, त्याबद्दल हा सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय 28 जून रोजी रवीनगर इथल्या विधी महाविद्यालयाच्या शताब्दी वर्ष निमित्त महाविद्यालय परिसरात तयार करण्यात आलेल्या संविधान उद्देशिका पार्कचे उद्घाटन देखील त्यांच्या हस्ते होईल. तत्पूर्वी, जिल्हा वकील संघटनेतर्फे 27 जून रोजी जिल्हा न्यायालयाच्या परिसरात संध्याकाळी सहा वाजता सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार समारंभ होणार आहे. या कार्यक्रमादरम्यान गवई यांच्या हस्ते जिल्हा न्यायालयाच्या नवीन विस्तारित इमारतीमधील संविधान निर्माते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील तैलचित्राचे अनावरण देखील करण्यात येणार आहे. तसेच संविधान उद्देशिका, संगणकीकृत ग्रंथालय आणि कार्यालयाचे उद्घाटन देखील त्यांच्या हस्ते होणार आहे. तत्पूर्वी आज, सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांचे आज अमरावती विमानतळ इथं आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी खासदार बळवंत वानखडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल उपस्थित होते.

-----------------------------------

**नीरज चोप्रा**

**भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा याने ओस्ट्रावा गोल्डन स्पाईक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. नीरजने ८५ मीटर २९ सेंटीमीटर अंतरावर भाला फेकला. नीरजने गेल्याच आठवड्यात पॅरिस इथे झालेल्या डायमंड लीग स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवलं होतं.**

-----------------------------------

**सल्लागार समितीची बैठक**

**आकाशवाणी नागपूरच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीची बैठक आज आकाशवाणी कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली या बैठकीमध्ये जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2025 या तिमाहीत कृषी आणि गृह विभागाच्या वतीने प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांवर शिक्का मोर्तब करण्यात आला. या बैठकीला आकाशवाणी नागपूरचे उपमहानिदेशक रमेश घरडे, कार्यक्रम प्रमुख प्रियदर्शनी राऊत यांनी मार्गदर्शन केलं. ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सचिव सचिन लाडोळे यांनी या तिमाहीत प्रसारित होणाऱ्या विशेष कार्यक्रमांची माहिती उपस्थित सदस्यांना दिली.**

-----------------------------------